# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २५/१०/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४६५** **विषय क्रमांक- ४६५**
**दिनांक – २५/१०/२०२३** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४६५ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/०२/१५८/२०२३ दि.११/१०/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक २३६६ दि.१८/१०/२०२३ अन्वये, मनपाचे अ प्रभाग स्थापत्य विभागातील विविध कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत. |
| **ठराव क्र.४६५ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/०२/१५८/२०२३ दि.११/१०/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक २३६६ दि.१८/१०/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र. १० मधील मोरवाडी सर्व्हे नं / गट क्र १३९ पै येथे मनपाची औद्योगीक प्रशिक्षण संस्था आहे. सदरचे इमारतीचे क्षेत्रफळ ४४०० चौ. मी. असून सद्यस्थितीत चौथ्या मजल्याचे विस्तारीकरण करणेचे काम चालू आहे. सदरच्या औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये मा.अतिरीक्त आयुक्त(३) व मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य अ क्षेत्रिय कार्यालय यांनी दिनांक २४/०४/२०२३ रोजी स्थळ पाहणी केली सदर पाहणीत मा.प्राचार्य, औद्योगीक प्रशिक्षण संस्था यांनी संस्थेमध्ये काही कामांची आवश्यकता असलेचे निदर्शनास आणून दिले. सदरची इमारत जुनी असल्याने तात्कालीन नियमाप्रमाणे इमारतीस लिफ्ट नाही. तथापी आता लिफ्टची आवश्यकता आहे. यासाठी २ उद्वाहक (लिफ्ट), स्वच्छतागृहांची दुरूस्ती/ नुतनीकरण करणे, टेरेसवर Proflex shed, पाय-यांना ग्रेनाईट, विविध झाडांना कट्टे करून नुतनीकरण करणे व इमारतीमध्ये विविध ठिकाणी फर्निचर विषयक कामे इत्यादी कामांचा समावेश आहे. याबाबत मा.प्राचार्य यांनी दिनांक ३०/०५/२०२३ चे पत्रान्वये मागणी केली आहे. वरील कामे आवश्यक असून अ प्रभाग स्थापत्य विभागाने त्याअनुषंगाने सदर कामाचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला आहे. परंतू त्यासाठी उपलब्ध तरतुद कमी (र.रू.१,०००/-) आहे त्यामुळे मा.अतिरिक्त आयुक्त(३) तथा नगरसचिव यांनी सदरची कामे करणेसाठी नगरसचिव विभागाची पान क्र १०७ अ क्र ५ वर असलेली उपलब्ध तरतुदीपैकी (र.रू.२,७५,००,०००/) पैकी आवश्यक तरतुद वर्गीकरण करणेबाबत सुचना दिल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्यालय इमारतीमध्ये मा.महापौर व इतर सर्व पदाधिकारी यांचे इमारतीच्या मुख्यालयात तसेच सर्व महत्वाचे विभागाचे कार्यालय आहे. लवकरच सार्वत्रिक निवडणूका होणार असल्याने त्याअनुषंगाने फर्निचर व स्थापत्य विषयक नुतनीकरण व वार्षिक स्वरूपाची देखभाल दुरूस्ती विषयक कामकाज करावे लागणार आहे. त्यासाठी या विभागामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर |

व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्याची निविदा रक्कम ७५.०० लक्ष इतकी येत आहे. त्याप्रमाणे नगरसचिव विभागाच्या लेखाशिर्षामधुन या कामासाठी र.रू. ५० लक्ष वर्गीकरण करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त दोन्ही कामे आवश्यक असल्याने खाली नमूद केले प्रमाणे कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम व तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

| अ क्र | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम | लेखा शिर्ष | पान क्र / अ क्र | सन २०२३-२४ ची तरतुद | वाढ | घट | सन २०२३-२४ ची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १० मधील मोरवाडी आय.टी.आय. येथे स्थापत्य व फर्निचर विषयक कामे करणे. | ७०००००० | ३५०००००० | विशेष योजना | ३५/ १६ | १००० | ७५००००० | | ७५०१००० |
| २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | ९०००००० | ९०००००० | विशेष योजना | ३१/ १७ | १००० | ५०००००० | | ५००१००० |
| ३ | २१०२०-११ मानधन व सभाभत्ता – मा. नगरसदस्य | | | नगर सचिव विभाग | १०७ /०५ | २७५००००० | | १२५००००० | १५०००००० |
| | | | | | | | १२५००००० | १२५००००० | |

**निर्णय:**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४६६**
**दिनांक – २५/१०/२०२३**

**विषय क्रमांक- ४६६**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४६६ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२३५/२०२३ दि.१०/१०/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक २३६७ दि.१८/१०/२०२३ अन्वये, मनपाच्या भाटनगर येथील लिंक रस्त्यावरील विद्युत दाहीनीचे वार्षिक पद्धतीने चालन देखभाल दुरुस्ती करणे कामास मुदतवाढ मिळणे तसेच होणा-या एकुण वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४६६ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२३५/२०२३ दि.१०/१०/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक २३६७ दि.१८/१०/२०२३ अन्वये, मनपाच्या भाटनगर येथील लिंक रस्त्यावरील विद्युत दाहीनीचे वार्षिक पद्धतीने चालन देखभाल दुरुस्ती करणे कामाचे आदेश क्र.विमुका/08/कावि/ 377/2022 दि.07/07/2022 नुसार मे.अल्फा इक़्युपमेंट यांना देणेत आलेले आहेत. सदर कामाची मुळ निविदा र.रू.८३,७०,०००/- इतकी असुन सदर कामाची १८ महिन्यांची मुदत दि.25/08/2023 रोजी संपत आहे. सन २०२३-२४ चे पुढील कालावधीचे कामाकरीता निविदा नोटीस क्र.22/1-2023-24 अन्वये दि.05/08/2023 रोजी निविदा प्रसिद्ध केलेली असुन सदर निविदा सादर करणेची अंतिम मुदत दि.1/09/2023 पर्यंत आहे. तद्नंतर निविदा उघडून पात्र निविदा धारकासोबत करारनामा करून आदेश निर्गत करणे करीता कालावधी लागणार आहे. त्या करीता सदर कामास मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सदरचे काम विद्युतदाहिनीचे चालन व देखभाल दुरूस्ती कामकाज असल्याने मुदती नंतरही पुढील कामाचे आदेश होईपर्यंत कामकाज चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे तातडीची बाब असल्याने सदर कामास किमान दोन महिने मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. तसेच सदर वाढीव कालावधी करीता ८.०१% टक्के मंजूर निविदा दर वजा जाता प्रती महा र.रु.४,२७,७५४/- प्रमाणे एकुण र.रू.८,५५,५०८/- अधीक वस्तू व सेवा कर मिळून र.रू.१०,०९,४९९/- इतका वाढीव खर्च अपेक्षीत आहे. सदर कामाची तातडी व पुढील कामाचे आदेश निर्गत करणे करीता लागणारा कालावधी विचारात घेता किमान दोन महिने मुदतवाढ व मुळ निविदा र.रू.८३,७०,०००/- निविदा दर ८.०१% वजा जाता र.रु.७६,९९,५६३/- अधिक १८% वस्तू व सेवा कर एकुण र.रू.९०,८५,४८४/- व वाढीव कालावधी साठी होणारा एकुण खर्च र.रू.१०,०९,४९८/- असे एकुण र.रू.१,००,९४,९८२/- (अक्षरी र.रू.एक कोटी चौ-यान्नव हजार नउशे ब्याऐंशी फक्त) इतक्या एकुण खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४६७**
**दिनांक – २५/१०/२०२३**

**विषय क्रमांक- ४६७**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४६७ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/२/२९८/२०२३ दि.१९/१०/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्रमांक १६ मध्ये मामुर्डी स्मशानभूमी जवळ पवनानदीवर मामुर्डी ते सांगवडे/ हिंजवडीसाठी पुल बांधणे याकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४६७ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/२/२९८/२०२३ दि.१९/१०/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्रमांक १६ मध्ये मामुर्डी स्मशानभूमी जवळ पवनानदीवर मामुर्डी ते सांगवडे/ हिंजवडीसाठी पुल बांधणे या विषयांकित कामाचा सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समावेश आलेला असून फक्त पुलाचे कामासाठी अंदाजपत्रकीय र.रू.१५,००,००,०००/- सुचविणेत आली आहे व त्याप्रमाणे मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६, दि. २९/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामासाठी महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर केला असता त्यांनी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.पुरनि२०१८/(१८२/२०१८) सिं.व्य. (महसुल) दि.०३/०५/२०१८ मधील मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेनुसार परिपत्रकाचे काटेकोर पालन करणेबाबत अवगत केले आहे. सदर परिपत्रकानुसार पुलाची जोता पातळी (Soffit level) लाल पुररेषेपेक्षा १.५० मी. उंचीवर वर असणे आवश्यक आहे. त्यानुसार सद्यस्थितीतील पुलाचे पातळीपेक्षा नियोजित पुलाची उंची वाढणार आहे. मामुर्डी बाजूकडील जोडरस्त्यासाठी सुधारित विकास आराखड्यानुसार नदीसमांतर रस्ता करणेचे नियोजित आहे. जलसंपदा विभागाचे परिपत्रकानुसार उच्चतम पुररेषा (HFL)गृहीत धरून नविन पुल बांधणेचे नियोजित आहे. त्याबाबचा तपशिल खालील प्रमाणे |

| अ.क्र | बाब | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | पवनानदीवरील मुख्य पुल बांधणे. (९०*१२ मी) | १६,५०,००,०००/- |
| २ | मामुर्डी बाजुकडील जोड रस्ता (Approch road)(३०० *१२ मी) | २२,५०,००,०००/- |
| ३ | सांगवडे हद्दीतील जोड रस्ता (१३० *१२ मी) | १०,००,००,०००/- |
| ४ | विदयुत विषयक कामे (स्ट्रीट लाईट) | १,००,००,०००/- |
| | एकुण | ५०,००,००,०००/- |

वर नमुद केलेल्या बाबीनुसार नविन पुलाचे बांधकामासाठीचे अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होणार असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींमुळे पुलाचे कामाचे अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होणार असून चालु दरसुची २०२२-२३ नुसार जीएसटीसह (GST)एकुण र.रू.५०,००,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<table>
<tr><td></td><td>

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र. | लेखा शिर्ष | सन२०२२ -२३ चे | | कामाची मुळप्रशासकीय रक्कम | सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२३ - २४ चीमुळ तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानक्र. | अ.क्र | | | |
| १ | प्रभाग क्रमांक १६ मध्ये मामुर्डी स्मशान भूमी जवळ पवनानदीवर मामुर्डी ते सांगवडे/ हिंजवडीसाठी पुल बांधणे. | १६ | विशेष योजना | ७५ | १ | १५००००००० | ५००००००००० | १००० |

वरीलप्रमाणे विषयास मा.महापालिका प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.
</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४६८**
**दिनांक – २५/१०/२०२३**

**विषय क्रमांक- ४६८**
**खाते-मा.आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्र. ४६८<br>दिनांक -<br>२५/१०/२०२३</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१३९२/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये, सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने कामाचा समावेश करुन तरतुदीमध्ये वाढ/घट करणेबाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ४६८<br>दिनांक -<br>२५/१०/२०२३</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१३९२/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील थेरगाव,डांगे चौक ते भुमकर चौक ते हिंजवडी हद्द या रस्त्यावरील वाहतुक कोंडीच्या समस्याबाबत दि.२५/०३/२०२३ रोजी स्थळ पाहणी झालेली आहे.स्थळ पाहणी दरम्यान थेरगाव,डांगे चौक ते भुमकर चौक ते हिंजवडी हद्द पर्यतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. त्याच अनुषंघाने स्थापत्य प्रकल्प विभागामार्फत उपरोक्त विषयांकित कामाचे सादरीकरण दि. १०/०५/२०२३ रोजी करणेत आलेले असुन त्यामध्ये झालेल्या निर्णयानुसार सदर स्थापत्यविषयक कामाचा सन २०२३-२४ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये नव्याने समाविष्ठ होणे गरजेचे आहे.<br><br>तसेच सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने कामाचा समावेश करुन त्यास लागणा-या तरतुदीत वाढ/घट करणे आवश्यक आहे.</td></tr>
</table>

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखा शिर्ष | पान क्र | अ. क्र | अंदाजपत्रकिय रक्कम | सन २०२३-२४ चा अंदाज | वाढ | घट | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रजिमा- ३१ रस्त्यावरीलथेर गाव,डांगे चौक ते भुमकर चौक ते हिंजवडी हद्दीपर्यतचा रस्ताअर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे | UTF | नविन काम | | १५०,००,००,००० | - | ९९००००० | | ९९००००० |
| २ | टेल्को रस्त्यावरील सेन्चुरी एल्का कंपनीकडुन सेवा रस्ते विकसित करणे. २२२३०८५९२ | UTF | ८८० | २७ | १००,००,००,००० | १००,००,००,००० | | ९९००००० | १००००० |
| | | | | | २५००००००००० | १,००,०००,०० | ९९००००० | ९९००००० | १०००००० |

वरील प्रमाणे वाढ/घट करणेस महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४६९**
**दिनांक – २५/१०/२०२३**

**विषय क्रमांक- ४६९**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ४६९ दिनांक - २५/१०/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. भा.आ./पापु प्रकल्प/२/५७३/२०२३ दि. २५/१०/२०२३ अन्वये, भामा आसखेड धरणाजवळ मौजे वाकी तर्फे वाडा येथे अशुध्द जलउपसा केंद्र बांधणे व त्यासाठी जॅकवेल, पंपहाऊस, ॲप्रोच ब्रीज, इंटेक चॅनेल बांधणे व विद्युत, यांत्रिकी, Instrumentation, SCADA सह इतर अनुषंगिक कामे करणे आणि १० वर्षे देखभाल दुरुस्ती करणे" या कामावर केंद्र व राज्य शासन हिश्याच्या प्राप्त होणा-या अनुदान रकमेनुसार महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये जमा/खर्च बाजूस वाढ करणेबाबत. |

**ठराव क्र. ४६९**
**दिनांक - २५/१०/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. भा.आ./पापु प्रकल्प/२/५७३/२०२३ दि. २५/१०/२०२३ अन्वये, केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाअंतर्गत “भामा आसखेड धरणाजवळ मौजे वाकी तर्फे वाडा येथे अशुध्द जलउपसा केंद्र बांधणे व त्यासाठी जॅकवेल,पंपहाऊस, अॅप्रोच ब्रीज, इंटेक चॅनेल बांधणे व विद्युत, यांत्रिकी,Instrumentation, SCADAसह इतर अनुषंगिक कामे करणे आणि १० वर्षे देखभाल दुरुस्ती करणे” या कामास कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक :-अमृत-२०२३/प्र.क्र.३६५/नवि-३३, दि.१६/१०/२०२३ नुसार केंद्र व राज्य शासन हिश्याचा पहिल्या हस्याचा निधी क्रेडिट लिमिट द्वारे मनपास प्राप्त झाला आहे. केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानाचा तपशील व त्याअनुषंगाने मनपा अंदाजपत्रकात सदर कामावर करावयाच्या जमा/खर्चाचा तपशिल खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे आहे.

(रक्कम रुपये कोटीमध्ये)

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | प्रकल्प किंमत (कोटीमध्ये) | निधी वितरणाचे टप्पे | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | मनपा हिस्सा | मनपा अंदाजपत्रक तरतूदीमध्ये जमा/खर्च बाजूस करावयाची वाढ | आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका | १५३.३६ | पहिला टप्पा (२०%) | ७.६७ | ७.६७ | १५.३४ | ३०.६८ | २०२३-२४ |
| २ | | | दुसरा टप्पा (४०%) | १५.३४ | १५.३४ | ३०.६८ | ६१.३६ | २०२३-२४ |
| | | | एकूण | २३.०१ | २३.०१ | ४६.०२ | ९२.०४ | |

उपरोक्त विषयांकित कामास वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे केंद्र व राज्य शासन हिश्याचा पहिल्या हस्याचे (२०%) क्रेडिट लिमिट र.रु.१५.३४ कोटी महानगरपालिकेस प्राप्त झाली असून सदर लेखाशिर्ष/कामावर र.रु.१५.३४ कोटी इतकी रक्कम जमा करुन तितकीच रक्कम विषयांकित कामाचे ठेकेदारास रनिंग बिलापोटी अदा करणेसाठी खर्ची टाकणे आवश्यक आहे. तसेच यापुढे ३१ मार्च २०२४ पर्यंत केंद्र व राज्य शासन यांचेकडून प्राप्त होणारे केंद्र व राज्य शासन हिश्याचा दुस-या हस्याचे (४०%)क्रेडिट लिमिटर.रु.३०.६८ कोटी + मनपा हिस्सा ३०.६८ कोटी असे एकूण र.रु. ६१.३६ कोटी इतकी रक्कम विषयांकित लेषाशिर्ष/कामावर (बजेट कोड- २३२४०४६८६) अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये जमा/खर्च बाजूस वाढ करुन सदर कामाचे ठेकेदारास पुढील रनिंग बिलापोटी अदा करणेसाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४७०** **विषय क्रमांक- ४७०**
**दिनांक – २५/१०/२०२३** **खाते-मा.आयुक्त**

**विषय क्र. ४७०**
**दिनांक - २५/१०/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/६८९/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये,"प्रभाग क्र.२० येथील स.नं.१९१ पै ते १९५ पै. आय.सी.सी.देवी टॉवर शेजारील आय टू आर अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेवर मनपा क्षेत्रीय कार्यालय इमारत बांधणे" या नावाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करणेबाबत.

**ठराव क्र. ४७०**
**दिनांक - २५/१०/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/६८९/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये, ह क्षेत्रीय कार्यालयासाठी मौजे भोसरी येथील सर्व्हे नं.४३९ हॉटेल कलासागर शेजारील I To R अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेवर मा. आयुक्त यांनी दि.१८/१०/२०२२ रोजीच्या मंजूर प्रस्तावान्वये मान्यता दिलेली होती. सद्यस्थितीत मनपाच्या नगररचना विभागामार्फत आय.सी.सी. देवी टॉवर मुंबई – पुणे हायवेलगत मौजे पिंपरी स.नं.१९१ पै ते १९५ पैकी सि.स.नं.४८५४ या ठिकाणचा भुखंड I To R अंतर्गत मनपाच्या ताब्यात आलेला आहे. सदर भुखंड मुंबई – पुणे हायवेलगतचा आयताकृती मोकळया जागेत असल्याने 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या दृष्टीने व नागरिकांसाठी वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचा असल्याने मा. आयुक्त यांनी 'ह' क्षेत्रीय कार्यालयाची इमारतीसाठी दि.२७/०८/२०२३ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. तरी सदर 'ह' क्षेत्रीय कार्यालयासाठी नव्याने बांधण्यात येणा-या इमारतीच्या जागेत बदल झाल्यामुळे सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील 'विशेष योजना' या लेखाशिर्षावर "प्रभाग क्र.२० येथील स.नं.१९१ पै ते १९५ पै. आय.सी.सी.देवी टॉवर शेजारील आय टू आर अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेवर मनपा क्षेत्रीय कार्यालय इमारत बांधणे" या नावाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२३-२४ चे | | लेखाशिर्ष | बजेट कोड | सन २०२३-२४ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२३-२४ साठी एकूण मुळ तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पा.क्र | अ.क्र | | | | | | | |
| 1 | प्रभाग क्र.२० येथील स.नं.१९१ पै ते १९५ पै. आय.सी.सी.देवी टॉवर शेजारील आय टू आर | २० | ३५००००००० | अंदाजपत्रकात नाव नाही | | | | ० | १००० | ० | १००० | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेवर मनपा क्षेत्रीय कार्यालय इमारत बांधणे. | | | | | | | | | | | |
| 2 | प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील ७.०० मीटरचा डी.पी. रस्ता विकसित करणे. | २० | ५०००००० | ५६ | ५८ | विशेष योजना | **कोड - 232400229** (04-Roads and Bridges /01-Road and Pavements - Concrete | १००० | ० | १००० | ० | |
| | **एकूण** | | | | | | | १००० | १००० | १००० | १००० | |

तरी वरीलप्रमाणे सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समावेश करुन सदर कामावर तरतूद वर्गीकरणास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/काวि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४७१** **विषय क्रमांक- ४७१**
**दिनांक – २५/१०/२०२३** **खाते-मा.आयुक्त**

**विषय क्र. ४७१ दिनांक - २५/१०/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिमं/कावि/९अ/८३/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये, प्राथमिक शिक्षण विभागाकरीता नविन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत.

**ठराव क्र. ४७१ दिनांक - २५/१०/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिमं/कावि/९अ/८३/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागा अंतर्गत १०५ प्राथमिक शाळा असून त्यामध्ये अंदाजे ५०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदरचे शाळेसाठी व

कार्यालयीन खर्चा करिता कोणतीही उपाययोजना नाही, शाळा स्तरांवर जल्लोष अंतर्गत कार्यक्रम राबवले जातात विद्यार्थी गुणवत्ता विकास योजना, कौशल्य विकास, अभ्यासक दौरे, विद्यार्थ्यासाठी वेगवेगळे प्रशिक्षण, तसेच प्राथमिक शाळेमध्ये विविध Events होतात असे अनेक विद्यार्थ्याच्या विकासासाठीचे कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत मा.आयुक्तसो. यांनी शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीमध्ये सूचना केली होती. याशिवाय अतिरिक्त आयुक्त (१) यांनी देखील दि.21/09/2023 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचना दिल्या आहेत. प्राथमिक शाळा स्तरांवर जल्लोष अंतर्गत कार्यक्रम राबवले जातात विद्यार्थी गुणवत्ता विकास योजना, कौशल्य विकास, अभ्यासक दौरे, विद्यार्थ्यासाठी वेगवेगळे प्रशिक्षण, तसेच प्राथमिक शाळेमध्ये विविध Events करणेकरीता कार्यवाही प्रस्तावित असून त्यासाठी आवश्यक लेखाशिर्ष प्राथमिक शिक्षण विभागाकडील अंदाजपत्रकात उपलब्ध नाही, त्यामुळे सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकात “जल्लोष शिक्षणाचा खर्च” हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करून शिक्षण विभागाकडील “शिक्षण विषयक नाविन्यपूर्ण योजना” या लेखाशिर्षातील र.रु.40,20,000/-(अक्षरी र.रु चाळीस लाख वीस हजार फक्त) या नविन लेखाशिर्ष “जल्लोष शिक्षणाचा खर्च” या लेखाशिर्षावर खालीलप्रमाणे वर्ग करणेकामी मा.महानगरपालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | वाढ | घट |
|---|---|---|---|
| 1) | जल्लोष शिक्षणाचा खर्च | 40,20,000/- | - |
| 2) | शिक्षण विषयक नाविन्यपूर्ण योजना | - | 40,20,000/- |
| | एकुण र.रु | 40,20,000/- | 40,20,000/- |
| | | | |

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**